| | |
|---|---|
| **MHBI110023632019** | दाखल तारीख – १६/०८/२०१९ |
| | नोंदणी तारीख – १६/०८/२०१९ |
| | निकाल तारीख – ०२/०४/२०२६ |
| | कालावधी ०६ वर्षे ०७ महिने १६ दिवस |

भाग 'अ'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परीच्छेद ४४ (i)
गेवराई येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात
(पिठासिन अधिकारी – श्रुती ह.पाटील, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचेसमोर)

| | |
|---|---|
| | नियमित फौजदारी खटला क्र. १३२/२०१९<br>निशाणी क्र. १८९/ब |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | गु. र. नंबर १५२/२०१९ गेवराई पोलीस ठाणे. |
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन मार्फत अमोल रामचंद्र पाटील, रा.पाडळसिंगी, आय.आर.बी. टोलनाका. |
| प्रतिनिधीत्व | सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>श्रीमती एस. ए. गायकवाड. |
| विरुध्द | |
| आरोपी | **१. महेश सुखदेव दाभाडे,**<br>वय – २० वर्षे,<br>**२. दत्ता भगवान जाधव,**<br>वय – २३ वर्षे, |

SHRUTI HANUMANTRAO PATIL Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL Date: 2026.04.04 17:29:12 +0530

| | |
|---|---|
| | **३. कृष्णा सुदाम जगताप,**<br>वय – २० वर्षे,<br>**४. गुलाब विठ्ठल गिरी,**<br>वय – ३५ वर्षे,<br>**५. आण्णा बुकाहरी जाधव,**<br>वय – ३७ वर्षे,<br>**६. गणेश कचरु दाभाडे,**<br>वय – २५ वर्षे,<br>**७. शुभम रामहरी नन्नवरे,**<br>वय – २३ वर्षे,<br>**८. ज्ञानेश्वर सुभाष जाधव,**<br>वय – १९ वर्षे,<br>**९. लक्ष्मण महादेव जाधव,**<br>वय – ३३ वर्षे,<br>**१०. गणेश शिवाजी चौधरी,**<br>वय – २४ वर्षे,<br>**११. नारायण सखाराम चौधरी,**<br>वय – २७ वर्षे,<br>**१२. सखाराम जनार्दन काटकर,**<br>वय – २९ वर्षे,<br>**१३. गणेश बळीराम जगताप,**<br>वय – ३२ वर्षे,<br>**१४. जगन कीसनराव चव्हाण,**<br>वय – २९ वर्षे,<br>**१५. किशोर अच्युतराव साबळे,** |

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.04 17:29:17 +0530

| | |
|---|---|
| | वय – ३२ वर्षे,<br>**१६. बळीराम अच्युतराव साबळे,**<br>वय – ४३ वर्षे,<br>**१७. महादेव उर्फ आबा ज्ञानदेव काळे**<br>वय – २५ वर्षे,<br>**१८. दगडू उर्फ किशोर भिमा ससाणे,**<br>वय – ३० वर्षे,<br>सर्व रा. पाडळसिंगी, ता. गेवराई, जि. बीड. |
| **प्रतिनिधीत्व** | श्री. एस.पी. येवले, वकील |

## भाग 'ब'

## (फौजदारी नियमावली प्रकरण ६ परीच्छेद ४४ (ii)

| | |
|---|---|
| गुन्हाची तारीख | ०९/०४/२०१९ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | १०/०४/२०१९ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | १६/०८/२०१९ |
| आरोपींविरुद्ध दोषारोप ठेवल्याची तारीख | ०२/०३/२०२२ |
| पुरावा नोंदविल्यास प्रारंभ केल्याची तारीख | ०७/११/२०२२ |
| शेवटचा साक्षीदार तपासल्याचा तारीख | १५/०९/२०२५ |
| निकालाची तारीख | ०२/०४/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | **आरोपी क्र. १ ते १८ यांना निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

SHRUTI HANUMANTRAO PATIL Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL Date: 2026.04.04 17:29:22 +0530

## आरोपाचा तपशील

| आ. क्र . | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर सोडलेची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | दिलेली शिक्षा | फौ.प्र. सं कलम ४२८ संपरिक्षे दरम्यान निरुद्ध केलेल्या कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महेश सुखदेव दाभाडे | दि.११. ०४. २०१९ | दि.१२. ०४. २०१९ | भा.दं.वि.सं कायदा कलम ४५२, १४३, १४७, ३३६, ४२७ व सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण कायदा कलम ३ अन्वये | **आरोपींना निर्दोष मुक्त केले.** | --- |
| २ | दत्ता भगवान जाधव | -''- | -''- | | | |
| ३ | कृष्णा सुदाम जगताप | -''- | -''- | | | |
| ४ | गुलाब विठठल गिरी | -''- | -''- | | | |

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.04 17:29:27 +0530

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | आण्णा बुकाहरी जाधव | दि.१३.०४.२०१९ | दि.१३.०४.२०१९ | | | |
| ६ | गणेश कचरु दाभाडे | –''– | –''– | | | |
| ७ | शुभम रामहरी नन्नवरे | –''– | –''– | | | |
| ८ | ज्ञानेश्वर सुभाष जाधव | –''– | –''– | | | |
| ९ | लक्ष्मण महादेव जाधव | –''– | –''– | | | |
| १० | गणेश शिवाजी चौधरी | दि.१५.०४.२०१९ | दि.१५.०४.२०१९ | | | |
| ११ | नारायण सखाराम चौधरी | –''– | –''– | | | |
| १२ | सखाराम जनार्दन काटकर | –''– | –''– | | | |

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.04 17:29:32 +0530

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | गणेश बळीराम जगताप | –''– | –''– | | | |
| १४ | जगन कीसनराव चव्हाण | –''– | –''– | | | |
| १५ | किशोर अच्युतराव साबळे | –''– | –''– | | | |
| १६ | बळीराम अच्युतराव साबळे | –''– | –''– | | | |
| १७ | महादेव उर्फ आबा ज्ञानदेव काळे | दि.२३.०४.२०१९ | दि.२३.०४.२०१९ | | | |
| १८ | दगडू उर्फ किशोर भिमा ससाणे | –''– | –''– | | | |

SHRUTI HANUMANTRAO PATIL Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL Date: 2026.04.04 17:29:37 +0530

# न्यायनिर्णय

## (दिनांक ०२/०४/२०२६)

०१. आरोपी क्र. १ ते १८ विरुद्ध **भारतीय दंड संहिता कलम ४५२, १४३, १४७, ३३६, ४२७ व सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण कायदा कलम ३** प्रमाणे गुन्हा केल्याचे आरोपाखाली दोषारोप पत्र दाखल केलेले आहे.

०२. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, दिनांक ०९.०४.२०१९ रोजी संध्याकाळी ७.४५ वा. च्या सुमारास पाडळसिंगी शिवारातील राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ वर झालेल्या अपघातास आय.आर.बी. कंपनी जबाबदार आहे असे समजून आरोपींनी बेकायदेशिर जमाव जमवून टोलनाका, टोलबुथ, त्यामधील साहित्याची व इमारतीची तोडफोड करुन सार्वजनिक मालमत्ता असलेल्या टोलनाका व टोलबुथचे अंदाजे रु.४१,००,०००/- चे नुकसान केले. सबब, या घटनेची फिर्याद अमोल रामचंद्र पाटील याने गेवराई पोलीस ठाण्यात दिली.

## अन्वेषण व दोषारोप

०३. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर **१५२/२०१९** दाखल करण्यात आला. तपासकाम पोलीस उपनिरीक्षक ए.बी. गटकूळ यांनी केले. त्यांनी तपासकामात घटनास्थळी जावून पंचनामा केला, आरोपींना अटक केली, सांक्षीदारांचे तपास टिपणे नोंदविली. संपुर्ण तपासाअंती या न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले.

## खटला सुरु

०४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३ (२) खालील पोलीस अहवाल व त्याच्याबरोबर पाठविलेल्या कागदपत्रांचा विचार करता व दोन्ही पक्षांना आपले म्हणणे

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.04 17:29:42 +0530

मांडण्याची संधी दिल्यानंतर आरोपींनी वरील कलम अन्वये अपराध केल्याचे गृहित धरण्यास आधार असल्याने कलम २४० प्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता प्रमाणे आरोपींना त्यांच्या विरुध्द दाखल असलेल्या आरोपाचा आक्षय समजवण्यात आला. आणि ते गुन्हा कबुल करणार आहेत की, त्यांना काही बचाव दयायचा आहे याची विचारणा करण्यात आली. आरोपींनी संपरीक्षा करण्याची मागणी केली असता त्याप्रमाणे खटला सुरु झाला.

## साक्षीपुरावा

०५. फौजदारी प्रकिया संहिता कलम २४४ प्रमाणे सा.क्र.१ ते ४ यांना तपासण्यात आले. अभियोगपक्षातर्फे साक्षीदारांची तपासणी केल्यानंतर व आरोपींना त्यांचा बचाव देण्यास सांगण्यापूर्वी आरोपींना त्यांच्या विरुध्द दिसणा–या विशिष्ठ परिस्थितीचा खुलासा करणे शक्य व्हावे याकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१) (ब) नुसार आरोपींची तपासणी करणे आवश्यक आहे. साक्षीदारांच्या पुराव्यात आरोपींच्या विरुद्ध पुरावा आल्याने फौ. प्र. सं. कलम ३१३ अन्वये आरोपींचा जबाब **नि.क्र. १७० ते १८७** अन्वये नोंदविण्यात आला. आरोपींनी खोटी केस केली आहे असा बचाव घेतला.

## मुद्दे व निष्कर्ष

०६. तथ्य विषयक बाबींचा विचार केल्यावर, सरकार पक्षाने सादर केलेला पुरावा व दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष मी कारण मीमांसासह पुढील प्रमाणे देत आहे.

SHRUTI HANUMANTRAO PATIL Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL Date: 2026.04.04 17:29:47 +0530

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिद्ध करतो काय की, दिनांक ०९/०४/२०१९ रोजी संध्याकाळी ७.४५ वाजताच्या सुमारास मौजे पाडळसिंगी शिवारातील राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ वरील आय.आर.बी. टोलनाका येथे, आरोपींनी समान उददेशाने बेकायदेशिर जमाव जमवून टोलनाका व टोलबुथचे नुकसान करण्याच्या उददेशाने टोलबुथमध्ये प्रवेश केला ?<br>**(भारतीय दंड विधान संहिता कायदा कलम ४५२, सह कलम १४९)** | **सिध्द केले नाही.** |
| २. | अभियोगपक्ष असे सिद्ध करतो काय की, वर नमुद दिवशी वेळी ठिकाणी आरोपींनी समान उददेशाने आय.आर.बी. टोलनाका व टोलबुथचे नुकसान करण्यासाठी बेकायदेशिर जमाव जमवला ?<br>**(भारतीय दंड विधान संहिता कायदा कलम १४३, सह कलम १४९)** | **सिध्द केले नाही.** |
| ३. | अभियोगपक्ष असे सिद्ध करतो काय की, वर नमुद दिवशी वेळी ठिकाणी आरोपींनी समान उददेशाने आय.आर.बी. टोलनाका व टोलबुथचे नुकसान करण्यासाठी बेकायदेशिर जमाव जमवून दंगा केला ?<br>**(भारतीय दंड विधान संहिता कायदा कलम १४७, सह कलम १४९)** | **सिध्द केले नाही.** |

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.04 17:29:52 +0530

| | | |
|---|---|---|
| ४. | अभियोगपक्ष असे सिद्ध करतो काय की, वर नमुद दिवशी वेळी ठिकाणी आरोपींनी समान उददेशाने बेकायदेशिर जमाव जमवून बलप्रयोग करुन दंगा केला व त्यामुळे तेथील लोकांची वैयक्तीक सुरक्षीतता धोक्यात आली ?<br>**(भारतीय दंड विधान संहिता कायदा कलम ३३६, सह कलम १४९)** | **सिध्द केले नाही.** |
| ५. | अभियोगपक्ष असे सिद्ध करतो काय की, वर नमुद दिवशी वेळी ठिकाणी वर नमुद दिवशी वेळी ठिकाणी आरोपींनी समान उददेशाने बेकायदेशिर जमाव जमवून आय.आर.बी. टोलनाका व टोलबुथचे रक्कम रु.४१,००,०००/- चे नुकसान केले ?<br>**(भारतीय दंड विधान संहिता कायदा कलम ४२७, सह कलम १४९)** | **सिध्द केले नाही.** |
| ६. | अभियोगपक्ष असे सिद्ध करतो काय की, वर नमुद दिवशी वेळी ठिकाणी वर नमुद दिवशी वेळी ठिकाणी आरोपींनी समान उददेशाने बेकायदेशिर जमाव जमवून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केले ?<br>**(सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण कायदा कलम ३)** | **सिध्द केले नाही.** |
| ७. | आदेश काय? | **आरोपी क्र. १ ते १८ यांची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.04 17:29:57 +0530

## कारणमिमांसा

०७. आरोपींतर्फे एकही कागदोपत्री पुरावा मान्य केला नाही. त्यामुळे सर्व कागदोपत्री पुरावे सिध्द करण्याची जबाबदारी अभियोगपक्षाची आहे. त्यामुळे संबंधित साक्षीदार तपासणे गरजेचे आहे.

०८. अभियोगपक्षातर्फे वकील सहा. सरकारी विधीज्ञा श्रीमती एस. ए. गायकवाड आणि आरोपींतर्फे वकील श्री. एस.पी. येवले यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले.

## मुद्दे क्र. १ ते ६ करीता

०९. वादमुद्दे १ ते ६ हे एकाच साखळीतील दुवे असल्याने पुराव्याचा उहापोह टाळण्यासाठी ते एकत्रीत चर्चीले आहेत.

१०. अभियोग पक्षाने **सा.क्र.१ फिर्यादी अमोल पाटील** यांची साक्ष **नि.१२०** येथे नोंदवलली आहे. त्यांच्या पुराव्यानुसार ते सदर टोलनाक्यावर शिफ्ट इन्चार्ज म्हणून काम करत असताना संध्याकाळी ७.४५ वा. सुमारास घटनेच्या दिवशी २५ इसम इतर पदांवर देखील कार्यरत होते. त्यांची डयुटी रात्री १२.०० वा. पर्यत होती व ७.४५ वा.सुमारास ४० ते ५० लोकांचा जमाव आरडाओरडा करत टोलनाक्यावर आला व काहीही न बोलता त्यांनी इमारतीची टोलबुथची नासधूस करायला सुरुवात केली. त्यांनी बुथवर दगडफेक केली. त्यानंतर हा जमाव नाक्याच्या इमारतीमध्ये घुसला व ४ रेनियो कंपनीचे एलईडी मॉनीटर, ४ कीबोर्ड, २ एच.पी. कंपनीचे पेनड्राइव्ह, एच.पी. कंपनीचा प्रींटर, कॅनॉन कंपनीचा स्कॅनर, लॉयड कंपनीचे ४ ए.सी., २ एल.जी. कंपनीचे ३२ इंचाचे टीव्ही, नीलकमल कंपनीच्या १० प्लास्टीकच्या खुर्ची आणि १० फिरणा–या खुर्ची, १ काचेचा

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.04 17:30:03 +0530

टीपॉय, १० फायबर एक्स्टींगवीशर, २ लाकडी ऑफीस टेबल, २ सीसीटीव्ही कॅमेरे, डेटा ठेवण्यासाठी वापरण्यात येणा–या एन.डी.आर., बुथमधील ५ एलईडी मॉनीटर, ५ कीबोर्ड, ३ थर्मल प्रींटर, ५ बारकोड स्कॅनर, १२ यु.एफ.डी., १२ एल.पी.आय.सी. कॅमेरा, १२ बुथ कॅमेरा, १२ ग्राफीक्स सिग्नल, एलईडी, १० बॅरीअर गेट, १० लॅन कॅमेरे, साधारण ५० झाडांच्या कुंडया तसेच टोल इमारत आणि बुथवरील काचा व काचांवरील जाळयांची मोडतोड केली. अंदाजे रु.४१,००,०००/– चे नुकसान झाले. सबब, त्यांनी आरोपींविरुध्द फिर्याद दिलेली आहे.

११. त्यांच्या पुराव्यात असेही आले आहे की, पाडळसिंगी उड्डाण पुलावर अपघातामध्ये एक इसम मृत झाल्याने व ३ ते ४ इसम जखमी झाल्यामुळे त्याला सर्वस्वी आय.आर.बी. कंपनी जबाबदार आहे असे वाटल्यामुळे त्यांनी हे कृत्य केले. ही कंपनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणा अंतर्गत काम करत असल्याने टोलनाक्यावरील सर्व साहित्य ही सार्वजनिक मालमत्ता आहे. न्यायालयाने साक्षीदाराला तोडफोड करणा–या व्यक्तींना ओळखु शकता का अशी विचारणा केली असता त्यांनी स्पष्ट मान्य केले की, जमाव हिंसाचार करत असल्याने मी तेथून पळून गेलो होतो.

१२. उलटतपासामध्ये त्यांनी हे नमूद केले की, रक्कम रु.४१,००,०००/– चे नुकसान झाले हे अत्यंत अंदाजे वक्तव्य केलेले आहे. त्यांनी हे मान्य केले की, अंधार असल्यामुळे जमावातील इसमांना त्यांनी स्वतः पाहिले नाही. ते कोणालाही व्यक्तीशः ओळखत नाहीत. तसेच कोणी निश्चीत काय नुकसान केले हेही त्यांना सांगता आले नाही. त्यांनी हे स्पष्ट मान्य केले की, घटना सुरु होती त्यावेळेस इतर कर्मचारी देखील घाबरुन पळून गेले होते. वरिष्ठ अधिकारी म्हेत्रे, दास आणि इतर कर्मचारी देखील टोलनाक्यावर उपस्थित नव्हते. त्यांनी हेही मान्य केले की, या घटनास्थळी आजुबाजूला १५ ते २० हॉटेल्स आहेत, लोकवस्ती आहे. शिवाय ही फिर्याद केवळ वरिष्ठांच्या सांगण्यानुसार

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.04 17:30:07 +0530

दिलेली आहे. तपासकामामध्ये त्यांना पोलीसांनी बोलावले नाही.

१३. फिर्यादीच्या उलटतपासातील तसेच सरतपासातील काही कथनांचा विचार करता हे स्पष्ट होते की, फिर्यादी या घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार नाही. तसेच या घटनेबाबत आरोपींची ओळख सांगण्याकरीता टोलनाक्यावर इतर कोणीही अधिकारी किंवा कर्मचारी त्यावेळेस उपस्थितच नव्हते. सबब, निश्चीत कोणत्या अज्ञात जमावाने सदरचे कृत्य केले याबाबत शंका उपस्थित होते. शिवाय या गुन्हयातील आरोपींचा निश्चीत या गुन्हयामध्ये काय हेतू होता ही बाब देखील सरकारपक्षाने अभिलेखावर आणलेली नाही. याउलट सदरची फिर्याद ही केवळ वरिष्ठांच्या सांगण्यावरुन देण्यात आल्याची बाब स्पष्ट होते.

१४. घटनास्थळी पंचनामा करतेवेळी उपस्थित असलेले पंच **साक्षीदार क्र.२ भाऊसाहेब कसबे** यांनी पुराव्यामध्ये नमूद केले की, दि.१०.०४.२०१९ ला पंचनामा करण्यासाठी त्यांना टोलनाक्यावर पंच म्हणून बोलावले होते. सुरुवातीला इमारती जवळ पंचनामा झाला, नंतर टोलनाक्या जवळ पंचनामा झाला. घटनास्थळ त्यांना कर्मचारी दास यांनी दाखविले. सदर साक्षीदाराची साक्ष नोंदवण्यात आलेली नाही मात्र त्यांचे तपासटिपण अभिलेखावर आहे. हा पंचनामा दुपारी १ ते १.३० चे सुमारास झाला. त्या ठिकाणी इमारतीच्या मुख्य दरवाज्यावरील काचा फोडलेल्या दिसून आल्या. टेबल, खुचर्या अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले, काचांचा सडा पडला होता, इतर साहित्याची नासधूस झाली होती. असा सविस्तर पंचनामा नि.पी२ त्यांच्या समक्ष पार पडला.

१५. पुढे त्यांनी नमूद केले की, टोलनाक्याच्या बुथची पाहणी केली असता तिथे देखील बुथ तुटलेले दिसले, सिसिटीव्ही कॅमेरांची तोडफोड झाली होती, बाहेरील बाजूस असलेले सेन्सर बुथ लाल हिरवे अलार्म बुमर तसेच बुथमधील कॅश ड्रॉवर आणि संगणकांची तोडफोड झाली होती. असा हा दुसरा पंचनामा पी३ त्यांच्यासमक्ष पार पडला.

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.04 17:30:12 +0530

१६. त्यांच्या उलटतपासानुसार ते एन.एच.ए.आय मध्ये सिव्हील अभियंता

म्हणून कार्यरत आहेत. त्यांना पी.एस.आय. गटकुळ यांनी फोन करुन औरंगाबाद वरुन बोलवून घेतले. त्यांना कोणताही पत्रव्यवहार झाला नव्हता. त्यांनी त्यांच्या मुख्यालय प्रकल्प संचालकांची तोंडी परवानगी घेवून ते पंचनाम्यासाठी आले. इतर कोणतीही बाब त्यांनी स्पष्ट नाकारलेली आहे. या साक्षीदाराच्या पुराव्यानुसार हा स्वतः एन.एच.ए.आय. मध्ये सिव्हील अभियंता म्हणून कार्यरत असल्याचे स्पष्ट होत असल्याने तसेच फिर्यादी यांची आय.आर.बी. कंपनी ही देखील महामार्गा संबंधातच काम करत असल्याने या साक्षीदाराची साक्ष विश्वासर्ह म्हणता येणार नाही. मात्र ती पूर्ण अविश्वासार्ह आहे असेही म्हणता येणार नाही. याबददल इतरही कागदोपत्री पुरावा पाहणे गरजेचे आहे.

१७. घटनास्थळी उपस्थित असलेले तथाकथीत प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.३ लक्ष्मण ननवरे हे सफाई कामगार म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी नमूद केले की, टोलनाक्याच्या अलीकडे एक ते दीड किलोमीटर अंतरावर एक अपघात झाला होता. त्यामुळे टोलनाक्यावर अनेकजण आले. त्यांना आलेले पाहून त्याने घाबरुन पळ काढला. ही घटना निश्चीत कधी झाली, कोण इसम होते, त्यांची नावे काय याबाबत साक्षीदाराला कथन करता आले नाही.

१८. न्यायालयाच्या पूर्व परवानगीने या साक्षीदाराला भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये सूचक प्रश्न विचारले असता त्याने स्पष्टपणे नमूद केले की, टोलनाक्यावर तोडफोड झाल्याचे माहिती आहे मात्र तो घटनास्थळावरुन पळून गेल्याने आरोपी कोण होते हे त्याला सांगता येणार नाही. त्यामुळे या साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षाला पूरक नाही.

१९. अभियोगपक्षातर्फे **सा.क्र.४ रविंद्र गटकुळ** ज्यांनी तपासकाम केले आहे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, सहाय्यक पोलीस फौजदार एस.जी. सुक्रे यांनी दाखल केलेल्या गुन्हयाचे तपासकाम त्यांच्याकडे सुपूर्त झाले. तपासकामात त्यांनी

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.04 17:30:17 +0530

सर्वप्रथम इमारतीचा पंचनामा, टोलबुथचा पंचनामा केला. आरोपींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला मात्र आरोपी मिळून आले नाहीत. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांची तपासटिपणे नोंदवली. घटनास्थळ पंचनामा करतेवेळी तोडफोड झालेल्या वस्तूंचे मूल्यांकन करुन एकूण नुकसान किती झाले त्याची पडताळणी केली. दि.११.०४.२०१९ रोजी आरोपींना अटक झाली. सुरुवातीला एकूण ४ आरोपी आढळून आले. त्यानंतर दि.१३.०४.२०१९ रोजी इतर ४ आरोपींना अटक झाली. दि.१५.०४.२०१९ रोजी इतर ७ आरोपींना अटक झाली. दि.२३.०४.२०१९ रोजी आणखी २ आरोपींना अटक झाली. दरम्यानच्या काळात मा. अप्पर जिल्हा दंडाधिकारी बीड यांचा जमाव बंदीचा आदेश पारीत होता त्याचा भंग करुन आरोपी जमावाने त्यांचे गुन्हयाचे समान उददीष्ट साध्य करण्याकरीता टोलनाका, इमारत आणि बुथमध्ये घुसून साहित्याची नासधूस केली, सबब त्यांच्याविरुध्द त्यांनी भा.द.वि. कायदा कलम १४३, १४७, १४९, ३३६, ४५२, ४२७ तसेच सार्वजनिक मालमत्ता विद्रुपण कायदा सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

२०. तपासीक अधिका-यांच्या उलटतपासात त्यांनी नमूद केले की, फिर्यादी कडे पुन्हा चौकशी करण्यात आली नव्हती. फिर्यादी जबाबात कोणत्याच आरोपीचे नाव स्पष्ट नमूद नाही. नुकसान झाल्याबाबत कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही. अज्ञात आरोपी असताना ओळखपरेड घेणे आवश्यक होते. मात्र अशी कोणतीही ओळखपरेड घेण्यात आलेली नाही. आरोपींची ओळख पटण्यासाठी सिसिटीव्ही फुटेजचा पुरावा महत्वाचा ठरू शकत होता मात्र तोही इलेक्ट्रॉनीक पुरावा जप्त केला नाही.

२१. या तोंडी पुराव्या व्यतिरिक्त इतर कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आला नाही. घटनास्थळ ही सार्वजनिक जागा असल्याने आरोपींची ओळख पटवण्याकरीता प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष नोंदवणे गरजेचे होते. शिवाय तपासण्यात आलेले साक्षीदार

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.04 17:30:21 +0530

हे फिर्यादी कंपनीच्या संबंधीत असल्याने पंचनामा निर्विवादपणे विश्वार्स म्हणता येणार नाही. अभियोगपक्षाला इतर साक्षीदारांची साक्ष नोंदवणे शक्य असताना केवळ काही स्थानीक कर्मचा–यांची साक्ष नोंदवल्याचे दिसून येते.

२२. अभियोगपक्षाच्याच कथनानुसार ४० ते ५० लोकांचा जमाव तोडफोड करण्याकरीता आला होता मात्र अटक झालेल्या आरोपींना निश्चीत कोणत्या पुराव्याखाली अटक करण्यात आली याबाबत तपासिक अधिका–यांनी स्पष्टीकरण दिले नाही. फरार आरोपींना कसे ओळखण्यात आले याबाबत देखील कोणतेही स्पष्टीकरण नाही. सदरच्या घटनेवेळी आजुबाजूच्या परिसरात उपस्थित असणारे हॉटेल मधील ग्राहक, हॉटेल चालक किंवा इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविणे सरकारपक्षाला फायदेशिर ठरु शकत होते. मात्र तपासकामातील या त्रुटींमुळे अभियोगपक्षाच्या पुराव्यात शंका उपस्थित होते.

२३. सबब, दि.०९.०४.२०१९ रोजी सदर आरोपींनी गुन्हयाचे समान उददीष्ट साध्य करण्याकरीता टोलनाका परिसरात जमाव जमवून टोलनाका बुथ तसेच इमारतीमध्ये प्रवेश करुन इमारतीतील साहित्याचे, बुथमधील साहित्याचे नुकसान केले ही बाब संशयाच्या पलीकडे जावून सिध्द झालेली नाही. सबब निर्माण झालेल्या संशयाचा फायदा आरोपी पक्षास देणे कायदयाने अभिप्रेत आहे. **सबब, मी मुद्दा क्र.१ ते ६ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.**

## मुद्दा क्र. ७ करीता.

२४. मुद्दा क्र १ ते ६ च्या नकारार्थी निष्कर्षावरून असे दिसून येते की, आरोपींना त्यांच्या विरुध्द लावण्यात आलेल्या सर्व आरोपांतून निर्दोष मुक्त करणे योग्य होईल. आरोपी क्र. १ ते १८ यांना फौ.प्र.सं.कलम ४३७–अ प्रमाणे निकटतम अपिल न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी पुढील सहा महिन्याकरीता प्रतिभुतीसह

SHRUTI HANUMANTRAO PATIL Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL Date: 2026.04.04 17:30:26 +0530

जमानतपत्र देण्याचे निर्देश देण्यात येत आहेत. अंततः मी मुद्दा क्र. ७ च्या उत्तरार्थ आरोपी क्र. १ ते १८ यांची सर्व आरोपांतून निर्दोष मुक्तता करणेत येत आहे असे म्हणून पुढील अंतीम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ महेश सुखदेव दाभाडे, आरोपी क्र.२ दत्ता भगवान जाधव, आरोपी क्र.३ कृष्णा सुदाम जगताप, आरोपी क्र.४ गुलाब विठठल गिरी, आरोपी क्र.५ आण्णा बुकाहरी जाधव, आरोपी क्र.६ गणेश कचरु दाभाडे, आरोपी क्र.७ शुभम रामहरी नन्नवरे, आरोपी क्र.८ ज्ञानेश्वर सुभाष जाधव, आरोपी क्र.९ लक्ष्मण महादेव जाधव, आरोपी क्र.१० गणेश शिवाजी चौधरी, आरोपी क्र.११ नारायण सखाराम चौधरी, आरोपी क्र.१२ सखाराम जनार्दन काटकर, आरोपी क्र.१३ गणेश बळीराम जगताप, आरोपी क्र.१४ जगन कीसनराव चव्हाण, आरोपी क्र.१५ किशोर अच्युतराव साबळे, आरोपी क्र.१६ बळीराम अच्युतराव साबळे, आरोपी क्र.१७ महादेव उर्फ आबा ज्ञानदेव काळे व आरोपी क्र.१८ दगडू उर्फ किशोर भिमा ससाणे, यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) मधील तरतुदीनुसार भारतीय दंड विधान संहिता कायदा कलम ४५२, १४३, १४७, ३३६, ४२७ व सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण कायदा कलम ३ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी क्र. १ ते १८ यांचे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येतात व जामीनदारांना भारमुक्त करण्यात येते.

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.04 17:30:32 +0530

३. आरोपी क्र.१ ते १८ यांनी फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ४३७ अ प्रमाणे मा. वरीष्ठ न्यायालयात जेव्हा या निर्णयाविरुध्द दाखल होणारे अपील अथवा अर्जाच्या कामी नोटीस देईल तेव्हा वरीष्ठ न्यायालयासमोर हजर राहणेकरीता सहा महीन्याच्या कालावधीसाठी प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/– चे बंधपत्र द्यावयाचे आहे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.)**

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.04 17:30:36 +0530

**दिनांक– ०२/०४/२०२६** **( श्रुती ह. पाटील )**
**स्थळ – गेवराई** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, गेवराई.**
**(कोर्ट क्र. २)**

# परीशिष्ठ

<table>
<tr><td colspan="4">भाग ‘क’<br>(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परीच्छेद ४४ (iii)</td></tr>
<tr><td colspan="4">साक्षीदारांची यादी<br>अ. सरकारी/बचाव साक्षीदारांची यादी<br>सरकारी साक्षीदारांची यादी</td></tr>
<tr><td>साक्षीदार क्रमांक</td><td>नाव</td><td>(पुराव्याचे स्वरूप) साक्षीदाराची भूमिका</td><td>निशाण</td></tr>
<tr><td>साक्षीदार क्रमांक १</td><td>अमोल रामचंद्र पाटील</td><td>फिर्यादी</td><td>१२०</td></tr>
<tr><td>साक्षीदार क्रमांक २</td><td>भाऊसाहेब मधुकर कसबे</td><td>घटनास्थळ पंच</td><td>१२१</td></tr>
<tr><td>साक्षीदार क्रमांक ३</td><td>लक्ष्मण निवृत्ती नन्नवरे</td><td>साक्षीदार</td><td>१४२</td></tr>
<tr><td>साक्षीदार क्रमांक ४</td><td>अरविंद भारत गटकुळ</td><td>तपास अधिकारी</td><td>१५०</td></tr>
</table>

**ब. बचावाचे साक्षीदार**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरूप (साक्षीदाराची भूमिका) |
|---|---|---|
| --- | --- | --- |

**क. सरकारी/ बचाव कागदोपत्री निशाणाची यादी:**

**सरकारतर्फे कागदोपत्री पुरावे**

| वर्णन | निशाण |
|---|---|
| -- | -- |

SHRUTI HANUMANTRAO PATIL Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL Date: 2026.04.04 17:30:41 +0530

## मुद्देमाल

| मुद्देमाल वस्तु क्र . | वर्णन |
|---|---|
| -- | -- |

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.04 17:30:45 +0530

दिनांक–०२/०४/२०२६ ( श्रुती ह. पाटील )

स्थळ – गेवराई न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, गेवराई.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | :- | 04.04.2026 |
| Transcribed on | :- | 04.04.2026 |
| Checked & Signed on | :- | 04.04.2026 |

Sd/-
(P.B. Kusumkar)
Stenographer (G-3)